**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 30/01/2026

**आरोपी लोकसेवक** - श्री. शुभम भारत रोकडे , पद - वीज तंत्रज्ञ वर्ग 4, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालय सब स्टेशन ढोरकीन तालुका पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचे कडे 2,000/- (दोन हजार रुपये) लाच मागणी करुन तडजोडी अंती 1,500/- (एक हजार पाचशे रुपये) लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे एम.आय.डी.सी.पैठण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | श्री. शुभम भारत रोकडे , वय 25 वर्ष, व्यवसाय :- नौकरी, पद - वीज तंत्रज्ञ वर्ग 4, नेमणूक - महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालय सब स्टेशन ढोरकीन तालुका पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर , रा. जैन स्पिनर स्टॉक कुलस्वामिनी कलेक्शन जवळ एम.आय.डी.सी पैठण जि. जिल्हा छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 2,000/- (दोन हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 1,500/- (एक हजार पाचशे रुपये) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. राजू बी. नागलोत, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री.वाल्मीक कोरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | यातील तक्रारदार यांचे शेतीमध्ये विहिरीवर शासनाच्या सौर पंप योजने अंतर्गत सौर कृषी पंप घेण्यासाठी तक्रारदार यांनी केलेल्या अर्जाची छाननी होऊन त्यांच्या जमिनीचा सर्वे करुन अहवाल सादर करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 30/01/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे मागेल त्याला सौर कृषी पंप योजना अंतर्गत गटक्रमांक 160 जमिनीचा सर्वे करून देण्यासाठी 2000/-हजार रुपयांची पंचासमक्ष लाच मागणी करून, तडजोडीअंती 1500/- रुपये स्वीकारण्याचे मान्य केले.<br>आलोसे यांच्या लाच मागणी नंतर दिनांक 30/01/2026 रोजी शासकीय पंचा समक्ष सापळा कारवाई दरम्यान ढोरकिन कचनेर रोड, राधाकृष्ण लॉन्स समोर आलोसे यांनी स्वतः तक्रारदार यांच्या कडून 1500/-रुपये लाच रक्कम पंच साक्षीदारा समक्ष स्वीकारली. आलोसे यांनी लाच रक्कम स्वीकारल्यानंतर पंचासमक्ष त्यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द पोलीस ठाणे एमआयडीसी पैठण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केली आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री राजु नांगलोत यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह. साईनाथ तोडकर, राजेंद्र जोशी, प्रकाश डोंगरदिवे, सी.एन. बागुल ला. प्र. वि. घटक छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.